oct - 2020.

# ऑनलाईन शिक्षण : वर्तमान शिक्षणाचे उभरते स्वरुप

**प्रा. अभिजीत अनिलराव पिलखाने**
विभागप्रमुख लोकप्रशासन विभाग,
चे.शि.प्र. कला वरिष्ठ महाविद्यालय, हर्सूल सावंगी,
औरंगाबाद.
Email : abhijitpilkhane@gmail.com
Mob: +91 9423472318

शिक्षण काळाची गरज आणि आजच्या कालखंडातील अतिशय महत्वपूर्ण मानवी गरज आहे हेह नाकारत येत नाही. यात सर्व सामान्य शिक्षण वा कौशल्य आधारीत असा विचार करता परिस्थितीप्रमाणे त्याचे महत्व वाढते पण उपयुक्तता कमी होत नाही.

शिक्षण एक गतिशील आणि सामाजिक प्रक्रिया आहे. ज्या द्वारे मानवाच्या जन्मजात शक्तींचा विकास केला जाऊ शकतो शिक्षण शिकण्याची आणि शिकवण्याची पद्धत कला ही विषयानुरुप आणि व्यक्तीरुप पाहत आहोत. पण आजच्या कोरोना-१९ प्रार्दूभावात दुरस्त: शिक्षण पद्धत / ऑनलाईन शिक्षणाचे अन्यनसाधारण महत्व वाढले आहे आणि गरजेचे ठरत आहे.

एडम्स सत्य कथन करतात की बालक आपल्या वातावरणाने प्रभावित होतात. तसेच वातावरणासही प्रभावित करतात या प्रभावाने शिक्षणाचे स्वरुप हे वेळोवेळी बदलत राहते. शिक्षण तज्ञानुसार शिक्षणाचे मुख्यत्वे खालील स्वरुप पहावयास मिळतात.

**प्रत्यक्ष शिक्षा :** नावाप्रमाणेच हे शिक्षण, शिक्षक आणि विद्यार्थी प्रत्यक्ष संबंध आधारीत असते यात शिक्षक आणि सोबत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थीवर्गाचा प्रभाव शिकवणाऱ्यावर पडत असतो.

**अप्रत्यक्ष / दुरस्थ शिक्षण :** जनसंचार माध्यमाच्या विकासात्मक पहलुत सुलभ प्रकारे शिक्षण प्राप्त करण्याहेतु या शिक्षण पद्धतीचा उगम झाला आहे.

**व्यक्तिगत शिक्षण :** शिक्षण मनोबल सिद्धांताप्रमाणे प्रत्येक मुल, दुसऱ्या मुलापेक्षा भिन्न स्वरुपाचे असते. शिक्षणाचे आयोजन अशा भिन्नत्व दृष्टीचा विचार करुन व्हावे हेच व्यक्तिगत शिक्षण आहे पण मोठ्या प्रमाणात शिक्षणाच्या या रुपाला अव्यवहारीक स्वरुपाचे रुपाने पाहिले जाते.

**सामुहिक शिक्षण :** एकाच वेळेस अनेक व्यक्तींना शिक्षण प्रदान करण्याला सामुहिक शिक्षण म्हणतात, वर्तमान परिस्थितील यालाच सार्वधिक प्रचलित मान्य रुप आहे.

**संकुचित शिक्षण :** शिक्षण जेव्हा विद्यालय आणि विश्वविद्यालय मर्यादिपर्यंत सिमित ठेवले जाते तेव्हा संकुचित शिक्षण पद्धत संबोधतात.



Principal
Chetna Shikshan Prasarak Mandal Vaijapur
KALA VARISHtA MAHAVIDYALAYA
Sawangi, By Pss Road, Aurangabad-431008

**व्यापक शिक्षण :** जिवनांत पर्यत्न चालणाऱ्या शिक्षण यात अर्तभुत होते नावाप्रमाणे हे व्यापक स्वरुपात असते.

**औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण:** औपचारिक शिक्षणात निश्चित कालावधी, उद्देश, निश्चित अभ्यासक्रम हे समाविष्ट असतात तर औपचारिक शिक्षणाच्या विपरित अनौपचारिक शिक्षण असते जे प्राकृतिक आणि आकस्मित स्वरुपात प्राप्त होते.

समाजात शिक्षणाचे वरिष्ठ स्वरुप दृष्टीक्षेपात येत असले तरी यात अधिक प्रचलित स्वरुपात प्रत्यक्ष शिक्षण पद्धाी ही आहे. प्रत्यक्ष शिक्षण पद्धतीत बलाकास एका वयस्क भूमिकेसाठी तयार करुन समाजात एक जिम्मेदार नागरिक निर्माण करणे हेतू ज्ञान व कौल्य प्रदान केले जाते.

सद्य वर्तमान स्थितीत सर्वात मोठी समस्या सर्वासमोर उभी ठाकली आहे ती कोविड-१९, यामुळे भारतात नाही तर जगात बहुविध ठिकाणी अंगीकृत होणारी प्रत्यक्ष शिक्षण पद्धत ठप्प झाली आहे.

भारताच्या स्थिती बाबत विचार करता २२ मार्च रोजी जनता संचारबंदी आणि २४ मार्च रोजी संपूर्ण देशभरात लॉकडाऊन यामुळे प्रचलित प्रत्यक्ष शिक्षण पद्धती ला पर्यायी स्वरुपाचे कोणते साधन उपयुक्त आहे आणि ज्याचा वापर करता शिक्षण प्राप्त करणे व अध्यापन करणारे यांना या संक्रमण कोविड-१९ रोगापासून बचाव करत विद्यार्थी वर्गासाठी अविरत शिक्षण देणे ही प्रक्रिया पार पाडली जाऊ शकते. यात समोर आलेला पर्याय होता ऑनलाईन शिक्षण पद्धत. या नविन पद्धतीचा अवलंब करतांना प्रचलित परंपरागत शिक्षण पद्धतीचा त्याग करुन नविन स्वरुप तात्काळ अवलंबतांना विविध आवश्यक संसाधनांची जुळवाजूळव करणे हे कसोटीपूर्ण कार्य होते. भारतात नव्या पद्धतीचा अवलंब करण्यासाठी आवश्यक संसाधनाचा लेखाजोखा पाहता आवश्यक संसाधनात असणारी बाब स्मार्ट फोन हे २४% भारतीयाकडे उपलब्ध होते तर केवळ ११% कुटुंबाकडे हे संगणक होते. २४% कुटुंबाकडे इंटरनेट सुविधा उपलब्ध होती. कोविड-१९ संसर्ग टाळणेसाठी उपाययोजनेत सामाजिक दुरी ठेवण्यासाठी ऑनलाईन शिक्षण हा एकमात्र पर्याय शिल्लक होता.

कोविड-१९ पूर्वी विद्यार्थ्यी वर्ग हा ऑनलाईन शिक्षण माध्यमाचा वापर क्वचित प्रसंगी एखाद्या समस्यांचे निराकरण वा ती अधिक सुसूत्र रुपात समजावून घेणेसाठी वैकल्पिक स्वरुपात करित होता. यासाठी युट्यूब, गुगल अशा साईटचा वापर होत असे पण वर्तमान कोरोना-१९ या समस्याने ही वैकल्पिक व्यवस्था एकमात्र अनिवार्य व्यवस्था रुपात सामोरे आली आहे. सर्व प्रथम ही अनिवार्य व्यवस्था म्हणजे ऑनलाईन शिक्षण म्हणजे काय हे समजावून घेणे आवश्यक ठरते.

''ऑनलाईन शिक्षण'' शिक्षणाचे उभारते नविन रुप आहे यात विद्यार्थी इटरनेट माध्यमातू आपल्या फोन, लॅपटॉप, अथवा कम्प्युटर याचा उपयोग करित ज्ञानार्जन करतात.

"ऑनलाईन शिक्षण" कम्प्युटर आधारित प्रशिक्षण वेब आधारित प्रशिक्षण, इन्टरनेट आधारित प्रशिक्षण, ऑनलाईन प्रशिक्षण, इ-लर्निंग, कॉम्प्युटर एडेउ दुरस्था शिक्षण इत्यादी रुपात प्रांप्त केले जाते. ऑनलाईन शिक्षणात मुख्यत्वे: करुन

१) विद्यार्थी आणि अध्यापक एकाचवेळी इंटरनेटद्वारे स्वत:च्या सयंत्राद्वारे एकमेकांशी संपर्कात राहून वर्गाचे आयोजन करतात.

२) इंटरनेट माध्यमातून विद्यार्थी – अध्यापक विद्यार्थी, विद्यार्थी आपआपसात संवाद साधतात.

३) विद्यार्थी त्यांच सुविधेनेरुप संचित (Upload) विषय:वस्तूचे अध्यापन करतात.

यावरुन असे मांडता येते की, "ऑनलाईन शिक्षण" हे इंटरनेट माध्यमातून शिक्षक आणि विद्यार्थी शिक्षण सामग्री आणि त्याचे आकलन आपल्या विद्यार्थी वर्गापर्यंत पोहचवतात. या महामारी काळात ऑनलाईन शिक्षण हे वरदान ठरले आहे. वर्तमान परिस्थितीत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर वेबिनार तसेच शैक्षणिक बैढकांचे आयोजनासाठी ऑनलाईन पद्धतीचा वापर होत आहे.

या पद्धतीचे लाभ आणि तोटे हे दोन्हीही आहेत.

**"ऑनलाईन शिक्षण" लाभ**

१) "ऑनलाईन शिक्षण" ग्रहण करण्यासाठी आवागमनाची आवश्यकता विद्यार्थीवर्गास भासत नाही. यात त्यांची वेळ श्रम आणि धन याची बचत होते.

२) विद्यार्थी वर्गास घरी राहूनच शिकता येते या कारणाने त्यांचे श्रम वाचतात.

३) विद्यार्थी आपल्या सोईनुसार अभ्यास करतो.

४) एखादा शैक्षणिक मुद्दा समजला नाही तर पुन्हा तो त्याच मुद्याला पाहुन समाजावून घेतो.

५) विद्यार्थी सुचना संप्रेक्षण प्रणली शिकतो.

६) या माध्यमातुन अनेक विद्यार्थीवर्गास शिक्षण प्रदान करणे शक्य होते.

७) तांत्रिक पद्धतीने शिक्षण अवगत करतांना विद्यार्थीवर्गास तांत्रिक पद्धतीचे अवलोकन होते.

८) घरातच शिक्षण उपलब्ध झाल्याने, वाहतूक साधनाचा वापर करण्याची गरज भारत नाही यातून वातावरण प्रदुषण टाळण्यास मदत होते.

९) उपलब्ध संसाधन माध्यमातून प्राप्त चर्चात्मक पटल यातुन तो विविध या विशिष्ट बिंदू वर इतर वर्ग विद्यार्थीवर्गाशी चर्चा करुन समस्याचे समाधान प्राप्त करु शकतो.

१०) ऑनलाईन शिक्षण प्रणाली माध्यमातून देशातंर्गत नव्हे तर जागतिक पातळीवरील शिक्षणाची माहिती आणि रुची त्यात निर्माण होण्यास मदत होते.

**ऑनलाईन शिक्षणाचे तोटे**

१) या शिक्षणाद्वारे सामाजिक विकास हे तत्व बाधित होते.

२) या शिक्षणात विद्यार्थीवर्गास मानसिक थकवा तसेच यावर मात करणे या बाबी सुदुर राहतात.

३) हे माध्यम केवळ सधन विद्यार्थी प्राप्त करतात.

४) या व्यवस्थेत अनेक विध तांत्रिक त्रुट्यांना सामोरे जावे लागते.

५) ही शिक्षण प्रद्धती प्रचलित शिक्षण पद्धतीचा समकक्ष स्थान प्राप्त करत नाही.

६) सततच्या वापरामुळे दृश्य माध्यमाचा ताण डोळे यावर पडून दृष्टीपटलावर ताण पडून एक नकारात्मक प्रभाव तयार होतो.

७) ऑनलाईन शिक्षण पद्धतीत एकाच वेळेस अनेक प्रश्न वा शंका या चर्चा पेटीत (chat box) टाकण्यात येतात यात सर्व प्रश्न वा शंकाचे निराकरण अध्यापकामार्फत केले जाऊ शकत नाही.

८) या पद्धतीत डिजिटल प्लेटफॉर्म आणि आई.सी.टी. आधारित उपकरणे कसौटी पूर्ण करणेसाठी याचा विस्तार आवश्यक आहे. विद्युत उपकरणांना वारंवार पुर्नभरण (Recharges) करणे ही एक समस्या आहे.

९) अभियंता, चिकित्सा या अभ्यासक्रमातील प्रयोगासाठी प्रत्यक्ष रुपात काही बाबी आवश्यक, अभियंता शाखेरवाढी व्यवहारीक ज्ञानाधिष्ठित शिक्षणासाठी ऑनलाईन उपयुक्त ठरलेच हे शाश्वत सांगता येत नाही.

१०) ऑनलाईन शिक्षण हे भावनात्मक, गतिविधी आधारीत आणि अनुभवात्मक शिक्षण यात मिश्रीत केले जाऊ शकत नाही.

याबरोबरच शिक्षणात परस्पर मानवीय संवादाची कमतरता, सामाजिक गुणांचा विकास, परिक्षेस अनैतिक प्रकाराचा वापर, लहान वयात इंटरनेटला जोडले गेल्याने अपराधिक आणि अखिलते ससंबधी साग्रमीचे या कडे आकर्षिक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिक्षकांच्या बेरोजगारीची समस्या तसेच अधिकत्तम ऑनलाईन संचकन प्रक्रिया ही इंग्रजी माध्यमातून असल्याने इतर भाषिक विद्यार्थी विर्गास यास स्वत:ला जोडणे अवघड जाते. प्रत्यक्ष वर्गात विद्यार्थी जितका केंद्रींत होऊन अध्ययन करतो तितके यात केंद्रिकरण दिसून येत नाही. ही पद्धत खर्चिक असल्याकारणाने गरिब, वंचित मागास घटकात या विषयी अनास्ता निर्माण होऊन शिक्षण प्रक्रिया थांबवण्याचा धोका असतो.

## ऑनलाईन शिक्षण व्यवस्थित सॅचलन हेतू उपाय

ऑनलाईन शिक्षण पद्धती व्यवस्थित चालणेसाठी शिक्षकांना प्रशिक्षण ही गोष्ट महत्वाची ठरते. परंपरागत पद्धतीत निपुणता असणारा शिक्षक नविन तांत्रिक बाबीचा अंगीकार करण्यात विविध समस्यांना सामोरे जातो यात प्रशिक्षण ही बाब महत्वाची ठरते. शरकार / शासनामार्फत ऑनलाईन शिक्षणाबाबत विभिन्न संसाधनाचा वापर करुन शिक्षण पोहचवणे गरजेचे ठरते. शमाजात ऑनलाईन शिक्षण प्राप्त करतांना उद्‌भवणारे डिजिटल अंतर हे कमी करणे आवश्यक ठरते.

परिक्षेबाबत विचारले जाणारे परिक्षेतील प्रश्न ज्ञानवर्धक असावेत आणि यात इतर अनैतिक तत्वाचा वापर करणे अशक्य होईल या स्वरुपात प्रश्न असावे. या पद्धतीत विद्यार्थी वर्गात भावनात्मक, ज्ञानात्मक आणि क्रियात्मक या तिन्हीही बाबींचा विकास होणये आवश्यक आहे. अशा पद्धतीने शिक्षण घेतांना ही पद्धती स्थानिव/ मातृभाषेते सह सर्व भाषेते उपलब्ध व्हावीत ज्याने करुन याचा सार्वत्रिक प्रचार आणि प्रसार होऊन उपयुक्तता वाढेल.

आजच्या स्थितीत ऑनलाईन शिक्षण व्यवस्था विद्यार्थी वर्गासाठी वरदान ठरत आहे. काही फायद्याबरोबर तोटे ही यात दिसतात. शिक्षण देणारे अध्यापक वर्ग या नविन पद्धतीचा अवलंब करत सुव्यवस्थित आणि रुची पूर्वक अभ्यासक्रम शिकवण्याचे कौशल्य आत्मसात करत आहेत. घरातील वातावरणत उपयोगी ठरेल आणि उपलब्ध साधनांचा वापर करुन प्रयोगात्मक बाबी या तयार करतांना विद्यार्थी वर्गात कुशलता निर्माण करणे हा उद्देशही यात साध्य करता येतो. कोविड-१९ या संसर्गजन्य स्थितीत ऑनलाईन शिक्षण हा उत्तम विकल्प ठरत आहे.

**संदर्भ**


- www.mastree.com
- www.indiaeducation.net
- www.encyclopedia.com
- www.educations.com
- www.lyndia.com
- www.ceaurora.edu
- www.en.wikipedia.org/wiki/National_Education_policy_2020